आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

२८ ऑगस्ट २०२४ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- राष्ट्रीय औद्योगिक कॉरिडॉर विकास कार्यक्रमाअंतर्गत बारा नव्या ग्रीनफील्ड औद्योगिक स्मार्ट सिटी प्रकल्पांना केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी/ राज्यातल्या दिघी बंदर प्रकल्पाचा समावेश
- प्रधानमंत्री जनधन योजनेला दहा वर्षे पूर्ण/ प्रधानमंत्र्यांनी केलं लाभार्थ्यांचं अभिनंदन
- मालवणजवळ राजकोट इथं छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा पडल्याच्या निषेध मोर्चादरम्यान तणाव, येत्या रविवारी महाविकास आघाडीतर्फे गेट वे ऑफ इंडियावर आंदोलन
- १७ व्या आंतरराष्ट्रीय खगोलशास्त्र आणि अंतराळ भौतिकशास्त्र ऑलिम्पियाड स्पर्धेत भारताच्या चमूची १ सुवर्ण आणि ४ रौप्यपदकांची कमाई

**आणि**

- पॅरिस पॅरालिंपिक स्पर्धेला आजपासून प्रारंभ

**<><><><><>**

राष्ट्रीय औद्योगिक कॉरिडॉर विकास कार्यक्रमा अंतर्गत बारा नव्या ग्रीनफील्ड औद्योगिक स्मार्ट सिटींना केंद्रीय मंत्रिमंडळानं आज मंजुरी दिली. केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांन नवी दिल्लीत वार्ताहरांशी बोलताना ही माहिती दिली. यासाठी अंदाजे २८ हजार ६०२ कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात येणार असून यामुळे दहा लाख थेट आणि ३० लाख अप्रत्यक्ष रोजगार निर्मिती होईल, असं वैष्णव यांनी सांगितलं. हे प्रकल्प दहा राज्यांमध्ये राबवले जात आहेत. यात महाराष्ट्रातलं दिघी, उत्तराखंडमधलं खुरपिया, बिहारमधलं गया, पंजाबमध्ये राजपुरा-पतियाला, तेलंगणामध्ये जहीराबाद, आंध्र प्रदेशामधले ओरवकल आणि

कोप्परती, केरळमध्ये पलक्कड, राजस्थानमधले जोधपूर-पाली आणि उत्तर प्रदेशातले आग्रा आणि प्रयागराज या प्रकल्पांचा समावेश आहे.

सीसीईए अर्थात आर्थिक व्यवहार मंत्रिमंडळ समितीने दोन नवे रेल्वे मार्ग आणि एका मल्टी ट्रॅकिंग प्रकल्पासाठी ६ हजार ४५६ कोटी रुपयांच्या निधीला मंजुरी दिली आहे. या प्रकल्पामुळे दळणवळण सुलभ होईल, तेल आयात कमी होईल, तसंच कार्बन डायऑक्साईडचं उत्सर्जन कमी होण्यास मदत होईल, असं रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितलं. जमशेदपूर-पुरुलिया-आसनसोल या १२१ किलोमीटर अंतरासाठी तिसरी मार्गिका आणि सरदेगा-भालुमुडा या ३७ किलोमीटरच्या दुहेरी मार्गाला मंजुरी दिल्याची माहिती वैष्णव यांनी दिली. नवीन प्रकल्पांमुळे एक हजार ३०० खेडी जोडली जाणार असल्याचंही त्यांनी सांगितलं.

केंद्रीय मंत्रिमंडळ बैठकीत कृषी क्षेत्रातल्या पायाभूत सेवांच्या केंद्रीय क्षेत्र विस्तारालाही मंजुरी देण्यात आली. कृषी क्षेत्रातल्या पायाभूत सेवांना बळकट करण्यासाठी एआयएफ अर्थात कृषी पायाभूत सुविधा निधीचा विस्तार करण्याचा निर्णय केंद्रीय मंत्रिमंडळानं घेतला आहे. कृषी प्रकल्पांची व्याप्ती वाढवणं आणि कृषी पायाभूत सेवा परिससंस्थेला मजबूत करणं हा याचा हेतू  असल्याचं सरकारनं सांगितलं आहे.

देशातल्या २३४ शहरांमधे ७३० एफएम प्रसारण वाहिन्यांच्या लिलावाला केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. मातृभाषेत स्थानिक विषयांशी संबंधित प्रसारणाला प्रोत्साहन देण्यासाठी हा निर्णय घेतल्याचं वैष्णव यांनी सांगितलं. या निर्णयामुळे दुसऱ्या आणि तिसऱ्या श्रेणीच्या शहरांमधे एफ एम वाहिन्यांचं प्रसारण उपलब्ध होईल. यात महाराष्ट्रातल्या ११ शहरांचा समावेश आहे. आकांक्षित जिल्हे आणि नक्षल प्रभावित भागाला या प्रसारणासाठी प्राधान्य देण्यात आलं आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री जनधन योजनेला आज ‘एक दशक’ पूर्ण झालं. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी २८ ऑगस्ट २०१४ रोजी, ही योजना सुरु केली होती. या योजनेअंतर्गत आतापर्यंत ५३ कोटी जनधन खाती उघडण्यात आली आहेत. या योजनेच्या दशकपूर्ती निमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी लाभार्थ्यांचं अभिनंदन केलं असून ही योजना यशस्वी केल्याबद्दल त्यांचे आभार मानले आहेत. आर्थिक समावेशन आणि महिला – युवकांचं, सक्षमीकरणाच्या प्रयत्नांमधे जनधन योजनेचा महत्त्वाचा वाटा असल्याचं, मोदी यांनी समाजमाध्यमावर म्हटलं आहे.

हा जगातला सर्वात मोठा ‘वित्तीय समावेशन उपक्रम’ असून, अर्थ मंत्रालय, यामाध्यमातून उपेक्षित आणि आर्थिकदृष्ट्या मागास घटकांना आधार देण्याचा प्रयत्न सातत्यानं करत असल्याचं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सितारामन यांनी म्हटलं आहे.

<><><><><>

मालवण राजकोट इथं कोसळलेल्या पुतळ्याची पाहणी करण्यासाठी आज तिथं गेलेले शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते आदित्य ठाकरे आणि भाजपा नेते नारायण राणे यांच्या समर्थकांनी एकमेकांवर दगडफेक केली. यात एक पोलीस आणि एक महिला असे दोघे जखमी झाले. पुतळा पडल्याच्या निषेधार्थ महाविकास आघाडीनं आज पुकारलेल्या मालवण बंदला शंभर टक्के प्रतिसाद मिळाला. विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार आणि अंबादास दानवे, आदित्य ठाकरे, जयंत पाटील यांनी मोर्चात भाग घेतला. महाविकास आघाडीचे पदाधिकारी, आणि भाजपा नेते निलेश राणे तसंच त्यांचे समर्थक राजकोट इथं एकमेकांसमोर येताच दोन्ही बाजूकडून दगडफेक सुरू झाली. पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणली. पण मालवणमध्ये तणावपूर्ण वातावरण असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

पुतळा पडल्याच्या निषेधार्थ महाविकास आघाडी येत्या रविवारी मुंबईत गेट वे ऑफ इंडिया इथं आंदोलन करणार असल्याचं माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी मुंबईत वार्ताहर परिषदेत सांगितलं. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शरद पवार आणि काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले उपस्थित होते. जोरदार वाऱ्यामुळे पुतळा कोसळण्याची घटना कधीही घडली नसून स्मारकाच्या कामात भ्रष्टाचार झाल्याचं आरोप त्यांनी केला.

दरम्यान, या घटनेला विरोधकांनी निवडणुकीच्या चष्म्यातून पाहू नये, याचं राजकारण करू नये, असं आवाहन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी नागपूर इथं प्रसारमाध्यमांशी बोलताना केलं.

या घटनेच्या निषेधार्थ नवी मुंबई, अहमदनगर, वाशीम, बुलढाण्यासह राज्यात विविध ठिकाणी निषेध आंदोलनं झाली.

**<><><><><>**

लातूर जिल्ह्यात उदगीर इथं नगरपरिषदेनं उभारलेल्या बुद्ध विहाराचं उद्घाटन येत्या ४ सप्टेंबरला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या उपस्थितीत होणार आहे. उदगीरमधे तळवेस इथं बुध्द विहाराचं बांधकाम केलं आहे. कर्नाटकातल्या कलबुर्गी इथल्या बुध्द विहाराची ही प्रतिकृती आहे.

उद्घाटन समारंभाला राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार, यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

**<><><><><>**

वंचित बहुजन आघाडीनं आगामी विधानसभा निवडणुकीसाठी जाहीरनामा समितीत इंद्रजीत आलटे आणि सुमित आनंद या दोन नवीन सदस्यांचा समावेश केला आहे. वंचित बहुजन आघाडी जाहीरनामा समितीमध्ये आता बौद्ध, SC, ST, ओबीसी आणि मराठा समाजातल्या प्रतिनिधींसह ९ सदस्य आहेत.

**<><><><><>**

१७व्या आंतरराष्ट्रीय खगोलशास्त्र आणि खगोलभौतिकशास्त्र ऑलिम्पियाड स्पर्धेत भारताच्या चमूनं १ सुवर्ण आणि ४ रौप्यपदकांना गवसणी घातली आहे. १७ ते २६ ऑगस्टदरम्यान ब्राझिलची राजधानी रिओ दी जानेरो इथं झालेल्या या स्पर्धेत बंगळुरूचा दक्ष तयालिया यानं सुवर्ण, तर पुण्याचे आयुष कुठारी आणि सानिध्य सराफ, हैदराबादचा बानीब्रत माजी आणि बिहारचा पाणिनी या चौघांनी रौप्यपदकाची कमाई केली. पदकतालिकेत भारत आठव्या स्थानी राहिला. इंदोरच्या भारतीय तंत्रज्ञान संस्थेचे प्राध्यापक भार्गव वैद्य आणि मुंबईच्या होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्र, टाटा मूलभूत संशोधन संस्थेचे प्रितेश रणदिवे यांनी या चमूचं नेतृत्व केलं. पुढची खगोलशास्त्र आणि खगोलभौतिकशास्त्र ऑलिम्पियाड स्पर्धा मुंबईत होणार आहे.

**<><><><><>**

दिव्यांगांसाठीच्या पॅरालिंपिक स्पर्धेला आजपासून पॅरीस इथं सुरुवात होत आहे. या स्पर्धा येत्या ८ सप्टेंबर पर्यंत चालणार आहेत. एकूण २२ क्रीडाप्रकारांचा स्पर्धेत समावेश असून त्यातल्या १२ खेळांमधे भारताचा ८४ जणांचा संघ सहभागी होणार आहे. आतापर्यंतचा हा सर्वात मोठा पॅरालिंपिक संघ आहे. पॅरा सायकलिंग, पॅरा ज्युडो आणि पॅरा रोइंग या प्रकारांत प्रथमच भारतीय क्रिडापटू आपलं कौशल्य अजमावणार आहेत. २०२० मध्ये झालेल्या टोकिओ ऑलिंपिकचा सुवर्णपदक विजेता भालाफेकपटू सुमित अंतिल आणि अथलीट भाग्यश्री जाधव उद्घाटन सोहळ्यात भारताचे ध्वजवाहक असतील.

**<><><><><>**

शेअर बाजारात आज चढ उतार पाहायला मिळाले. दिवसअखेर मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समध्ये आज ७३ अंकांची वाढ झाली आणि तो ८१ हजार ७८६ अंकांवर बंद झाला. तर राष्ट्रीय शेअर बाजाराच्या निफ्टीमध्ये ३५ अंकांची वाढ

होऊन तो २५ हजार ५२ अंकांवर बंद झाला. निफ्टीने आज सत्रातला सार्वकालिक उच्चांक गाठला.

**<><><><><>**

राज्यात विविध जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्यामुळे अनेक धरणं भरली आहेत.

नाशिक जिल्ह्यात काल रात्रीपासून जोरदार पाऊस झाला. त्यामुळे गोदावरी नदीची पाण्याची पातळी वाढली आहे. बुलडाणा जिल्ह्यात दोन दिवसांच्या उघडीपीनंतर आज पावसाला पुन्हा सुरुवात झाली. सततच्या पावसामुळे जिल्ह्यातली जलाशय पूर्ण भरली आहेत.

सातारा जिल्ह्यात संततधार पावसामुळे कोयना धरणातला पाणीसाठी १०२ पूर्णांक ४३ दशांश टीएमसी इतका झाला आहे. त्यामुळे आज धरणाचे सहा वक्र दरवाजे उघडून कोयना नदीत पाणी सोडण्यात आलं. तसंच धोम धरणातून कृष्णा नदीत आणि वीर धरणातून नीरा नदीत पाणी सोडण्यात आलं. त्यामुळे कोयना, कृष्णा, नीरा नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. धाराशिव जिल्ह्यातही मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्यानं तेरणा धरण पूर्ण क्षमतेनं भरलं आहे.

**<><><><><>**

गेल्या चोवीस तासांत मध्य महाराष्ट्रात जोरदार पाऊस पडला. तर कोकण, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडला. पुढच्या दोन दिवसांत कोकण आणि विदर्भात अनेक ठिकाणी पाऊस पडण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यातल्या काही भागात पाऊस पडण्याची शक्यता आहे. पुढच्या दोन दिवसांत विदर्भात मेघगर्जनेसह पाऊस पडेल, असं हवामान विभागानं कळवलं आहे.

**<><><><><>**